जिल्हा परिषद, बीड

(सामान्य प्रशासन विभाग)

फोन नं. 02442-222342 ई-मेल आयडी dyceobeedgad@gmail.com


क्र.साप्रवि/आस्था-9/अनुकंपा/कावि-/ /2026 दिनांक - /05/2026

NO U 2 3 2 0 26 MAY 2026

प्रति,

अनुकंपाधारक (सर्व)

**विषय :- अनुकंपा तत्वावर गट - क च्या प्रतिक्षासूचीतून गट - ड प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करणे बाबत.**

संदर्भ :- 1) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.17 जुलै 2025

2) ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय दिनांक 31 जुलै 2025

3) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 22 ऑगस्ट 2025

उपरोक्त संदर्भीय विषयी, शासन निर्णय क्र.अकंपा-2025/प्र.क्र.442/आस्था-7 दिनांक 31 जुलै 2025 अन्वये सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. 17 जुलै 2025 अन्वये निश्चित केलेले "अनुकंपा नियुक्तीचे सर्व समावेशक सुधारीत धोरण" जिल्हा परिषदेच्या गट - क व गट - ड कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेले आहे.

शासन निर्णय दिनांक 17 जुलै 2025 (VII) (अ) मधील (2) अन्वये उमेदवाराने गट - क च्या प्रतिक्षासूची मधून गट - ड च्या प्रतिक्षासूचीमध्ये नाव समाविष्ट करावयाची विनंती केल्यास सर्व समावेशक धोरणानुसार उमेदवाराचे गट - क च्या प्रतिक्षासूचीतून नाव वगळुन गट - ड प्रतिक्षासूचीत समाविष्ट करणेबाबत तरतुद आहे.

करीता उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, उमेदवारास अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश देण्यापूर्वीच प्रतिक्षासूचीचा गट बदलण्याचा विनंती अर्ज करण्याची मुभा राहील. प्रतिक्षासूचीचा गट बदलण्याची विनंती फक्त एकदाच करता येईल. तसेच विनंती अर्जानुसार उमेदवाराचा गट बदलण्याची कार्यवाही केल्यानंतर पुन्हा मूळ गटातील (गट-क प्रतिक्षा यादीवर) नाव समाविष्ट करुन अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घेवून दिनांक 31/12/2025 अखेरच्या गट - क प्रतिक्षा सुचीतील उमेदवारांनी गट - ड च्या प्रतिक्षासूचीत नाव समाविष्ट करण्यासाठी **दिनांक ~~31~~ 10/06/2026** रोजी पर्यंत विनंती अर्ज सादर करावा. सदरील दिनांकानंतर विनंती अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

जितीन रहमान (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बीड

Scanned with OKEN Scanner